SPEED POST/RPAD

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय

१३ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय समोर, मुंबई-४०० ०३२. फोन (०२२) २२०४९१८४.
Website: sic.maharashtra.gov.in E-Mail: cic.mumbai@maharashtra.gov.in

सत्यमेव जयते


क्र.मुमाआ-२०२५ /प्र.क्र. ४५/०१ दि : २९ एप्रिल, २०२५

प्रति,

मा.मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई

विषय : **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये स्वयंप्रेणेने प्रकटीकरण करण्यासंदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८) (क) (तीन) आणि कलम २५ (५) अंतर्गत सार्वजनिक प्राधिकरणांना निर्देश**

राज्य माहिती आयोगाच्या खंडपीठांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रलंबित असलेल्या माहिती अधिकार अर्जांचा मुद्दा तसेच पूर्वीच उघड केलेली माहिती मिळविण्यासाठी माहिती अधिकार (आरटीआय) अधिनियम, २००५ चा वारंवार वापर केल्याने प्रत्यक्षात अनेक सार्वजनिक प्राधिकरणांच्या कामाचा भार वाढला आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत आलेले अर्ज आणि त्यांना दिलेली उत्तरे (अधिनियमात वगळलेल्या बाबी खेरीज करून) सार्वजनिक डोमेनमध्ये शोधण्यायोग्य डेटाबेसमध्ये ठेवल्यास जनसामान्यांना माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज दाखल न करताच माहिती मिळू शकेल ही बाब आयोगाच्या विचाराधीन होती.

२. केंद्र सरकारने २०११ मध्ये सार्वजनिक प्राधिकरणांनी स्वयंप्रेरणेने प्रकट करावयाच्या माहितीसंदर्भात नियुक्त केलेल्या कार्यगटाने दिलेल्या सूचनांनुसार, केंद्र शासनाच्या कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने (डीओपीटी) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व सार्वजनिक प्राधिकरकणांना दिलेल्या कार्यालयीन ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, "... कलम ४ अंतर्गत स्वतःहून माहिती प्रकट करण्याचा उद्देश सार्वजनिक प्राधिकरणाचे कामकाज अधिक पारदर्शक होणे आणि वैयक्तिक माहिती अधिकार अर्ज दाखल करण्याची आवश्यकता कमी करणे असा आहे." केंद्र शासनाच्या कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने (डीओपीटी) दि. १५ एप्रिल २०१३ रोजीच्या त्यांच्या ज्ञापन क्रमांक १/६/२०११-आयआर द्वारे यापूर्वीच असे निर्देश दिले आहेत की, "सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त अर्ज, अपील आणि त्यांना देण्यात आलेली उत्तरे सार्वजनिक प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर महत्त्वाचा शब्द (key word) आधारित शोध सुविधा देऊन स्वयंप्रेरणेने प्रकट करावेत."

३. माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रस्तावनेमध्ये नमूद करण्यात आले आहे की, "लोकशाहीमध्ये माहितीगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी तीच्या कार्यशीलतेच्या दृष्टीने तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांच्या यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने आवश्यक आहेत. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने, सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळवता यावी म्हणून,

नागरिकांच्या माहिती मिळण्याच्या अधिकाराची व्यवहार्य शासन पद्धत आखून देण्याकरिता व व्यवहारात माहितीच्या प्रकटनामुळे शासनाचे कामकाज कार्यक्षमरीत्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनशील माहितीची गोपनियता राखणे तसेच लोकशाहीच्या आदर्शांची परमोच्चता कायम राखत परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक असल्याने माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विवक्षित माहिती पुरविण्यासाठी तरतुद करणे आवश्यक असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ पारीत करण्यात आला आहे.

४. तसेच, माहिती अधिकाराच्या कलम १९(८) (क) (तीन) नुसार माहिती आयोगाला या अधिनियमातील तरतुदींचे अनुपालन करणे सुनिश्चित करण्यासाठी विवक्षित माहिती किंवा माहितीचा प्रवर्ग प्रसिद्ध करण्याचे सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मावण्याचे अधिकार आहेत तसेच कलम २५(५) मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, या अधिनियमान्वये सार्वजनिक प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यासासंबंधीची त्यांची कार्यपद्धती या अधिनियमाच्या तरतुदींशी किंवा आशयाशी अनुरूप नाही, असे यथास्थिती, केंद्रीय माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोग यांना दिसून आल्यास, आयोगास अशी अनुरूपता आणण्यासाठी त्यांच्या मते ज्या उपाययोजना करणे आवश्यक असेल त्या विनिर्दिष्ट करण्याची प्राधिकरणांना शिफारस करता येईल.

उपरोक्त बाबी विचारात घेऊन, या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८) (क) (तीन) आणि कलम २५ (५) अंतर्गत अधिकारांचा वापर करून, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्यातील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना खालीलप्रमाणे निर्देश जारी करीत आहेत :-

"**सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्याकडे प्राप्त होणारे सर्व माहिती अधिकार अर्ज आणि सदर अर्जांना देण्यात आलेली उत्तरे व माहिती (माहिती अधिकार कायद्याअंतर्गत सूट असलेल्या ठिकाणी वगळता) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर नागरिकांना सुलभरितीने शोधता येईल अशा पद्धतीने शोध सुविधा (key word search) देऊन स्वयंप्रेरणेने प्रकट करावी.**"

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी राज्य माहिती आयोगाचे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८) (क) (तीन) आणि कलम २५ (५) नुसार देण्यात आलेले निर्देश राज्यातील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांच्या निदर्शनास आणावेत.

**( राहुल पांडे)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य**